पुढारी



# प्रतिभा महाविद्यालयाचे राष्ट्रीय स्तरावर सायबर क्षेत्रात यश

**पिंपरी :** चिंचवड येथील प्रतिभा वाणिज्य आणि संगणक अध्ययन महाविद्यालयाने सायबर सुरक्षा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटवला आहे. क्विक हील फाउंडेशनच्या सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा, या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय कार्यक्रमात महाविद्यालयाच्या सायबर क्लबने उत्कृष्ट प्रदर्शन करत सर्वोत्कृष्ट सर्वंकष (ओव्हर ऑल) सायबर क्लब, या गटात द्वितीय उपविजेतेपद पटकावण्याचा बहुमान मिळवला.

देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरला. या स्पर्धेत विविध राज्यांतील अनेक महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. प्रतिभा महाविद्यालयाच्या सायबर क्लबने सातत्यपूर्ण प्रयत्न, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या कार्यामुळे स्पर्धेत आपले विशेष स्थान निर्माण केले.

या पुरस्कारांचे वितरण 'क्विक हील फाउंडेशन'च्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि 'महाराष्ट्र सायबर'चे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांच्या हस्ते पुणे येथे करण्यात आले. या वेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक करत, सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात तरुणांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास प्रतिभा शैक्षणिक संकूलचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शाह, प्राचार्या क्षितिजा गांधी, शिक्षक समन्वयिका डॉ. हर्षिता वाच्छानी, तसेच सायबर क्लबचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वैयक्तिक स्तरावरही उत्कृष्ट यश संपादन केले. आकाश ठाकूर यांनी 'सर्वोत्कृष्ट सचिव' या विभागात प्रथम उपविजेतेपद मिळवले. तसेच स्नेहा तेली आणि साकीब चौधरी यांना 'सर्वोत्कृष्ट सायबर योद्धा संघ' हा पुरस्कार प्राप्त झाला. श्रावणी सावंत यांना 'सर्वोत्कृष्ट कामगिरी (सर्वोत्कृष्ट अध्यक्षा)' हा सन्मान मिळाला; तर मानसी वाडेकर यांना 'सर्वोत्कृष्ट माध्यम संचालक' या विभागात नामांकन मिळाले. तसेच, हर्षिता वच्छानी यांना 'सर्वोत्कृष्ट शिक्षक समन्वयक' या विभागात नामांकन मिळाले असून, ही बाबदेखील महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे.